# ओएनजीसी (WOU) कर्मचारी संघटना
## मान्यताप्राप्त यूनियन

मित्रहो,

आपणांस ज्ञात आहेच की कर्मचारी संघटनेने केलेल्या मागण्या व प्रत्येक JCM मध्ये सातत्याने केलेला पाठपुराव्यामुळे इतर सवलतीप्रमाणे लॅपटॉप व डेटाकार्ड या सवलती केवळ मुंबईतच नव्हे तर संपूर्ण ओएनजीसीतील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यांना याचा लाभ मिळालेला आहे. आज कर्मचा-यांना लॅपटॉप देण्याची प्रकिया मॅनेजमेंटकडून पूर्ण झालेली असली तरी डेटाकार्डची ऑर्डर येवून सुध्दा अदयाप सदर सुविधा लागू न झाल्यामुळे कर्मचारी संघटनेने मा.श्री ए.के.अग्रवाल, I/c. Infocom यांची भेट घेवून या बाबत चर्चा केली चर्चेतून समजले की मॅनेजमेटकडून मान्य झालेल्या रु.450/- या रकमेनुसार इतर कंपन्याकडून केवळ 2 ते 2.5 GB डेटा मिळणार असून कर्मचा-यांना Reliance कंपनीच्या JIO प्लान नुसार रु.450/- मध्ये 8 GB पर्यत डेटा मिळवून देण्यासाठी मॅनेजमेटचे प्रयत्न चालू आहेत. कर्मचा-यांना होणारा अतिरिक्त फायदा लक्षात घेवून कर्मचारी संघटनेने देखील मॅनेजमेटचा सदर प्रस्तावास सहमती दर्शवली असुन लवकरात लवकर या प्रकिया पूर्ण करण्याविषयी विनंती केलेली आहे.

वरील सवलती मिळाल्यामुळे कर्मचा-यांमध्ये आज समाधानाचे वातावरण आहे. कर्मचारी संघटना तुम्हांला लॅपटॉप / डेटाकार्ड देणार होती त्याचे काय झाले. 'स्वतः काही न करता असे उठसुठ प्रश्न विचारुन कर्मचा-यांना भडकविणा-या मंडळीची तोंडे आज बंद झालेली आहेत.'

वरील सवलती प्रमाणेच 2004 MOU हा कर्मचारी संघटनेसाठी अत्यंत महत्वाचा विषय असुन या संदर्भातील चर्चा अंतिम टप्प्यात आलेली आहे. विरोधकांचे या MOU संदर्भात उलट-सुलट अफवा पसरविण्याचे प्रयत्न जरी चालू असले तरी कर्मचारी संघटना पूर्ण ताकदिनिशी कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत असुन दिवाळीनंतर त्वरीतच या कमिटीची मिटिंग लागण्याची शक्यता आहे. कर्मचारी संघटनेचा सन्मानिय प्रस्ताव जर मॅनेजमेटने मान्य केला तर हि बहूदा शेवटची मिटिंग असेल. एवढ्या प्रदीर्घ काळानंतर एखादा MOU हा परत ओपन करुन कर्मचा-यांचा होणारा फायदा हा एक ऐतिहासिक निर्णय होणार असुन ख-या अर्थाने कर्मचा-यांचा एकजुटीचा विजय होणार आहे.

धन्यवाद,

आपला नम्र,

(प्रदीप मयेकर)
महासचिव

दिनांक 28.10.2016